भाजीपाला,रोपमळे,फळरोपमळे,व स्थानिक उद्याने यांच्या बळकटीकरणासाठी निधी वितरीत करणे.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक :- पुरक-२०१७/प्र.क्र.१७७/१३-अे,**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- १६ फेब्रुवारी, २०१८

संदर्भ :- १) नियोजन विभाग,क्र.डिएपी-१०१६ /प्र.क्र.२११ /कार्यासन-१४८१,दि. २०/२/२०१७.
२) शासन निर्णय क्रमांक. फरोवा-२०१६/प्र.क्र.१४३/१३-अे, दि.१० जुलै,२०१७
३) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ/फलो-२/शारांवा/पूरकमाग/२७२५/१७. दि.०७/११/२०१७.

प्रस्तावना:-

राज्यात राबविण्यात येत असलेल्या रोजगार हमी योजना तसेच महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रमातंर्गत मुख्यत्वे शासकीय फळरोपवाटिकेवरील कलमे / झाडे लाभार्थ्यांना पुरविण्यात येतात. तसेच खुल्या विक्रीव्दारे शेतकऱ्यांना कलमे/रोपे उपलब्ध करुन देण्यात येतात. या व्यतिरिक्त शेतकऱ्यांना उत्कृष्ट वाणाच्या लागवड साहित्यांचा पुरवठा करणे, उच्च तंत्रज्ञानाचा वापर करुन रोपवाटिका विकसित करणे, रापवाटिके वरील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे, इत्यादी अनेक बाबीकरिता शासकीय रोपवाटिकांचे बळकटीकरण करणे आवश्यक आहे.

बागायती रोपमळयांचे व बळकटीकरण ही योजना जिल्हा वार्षिक योजनेतून वगळण्यात आली असल्याने, सदर योजना राज्य योजना म्हणून राबविण्यास शासन मान्यता देत आली आहे. या योजनेवरील खर्च "भाजीपाला रोपमळे,फळे रोपमळे,व स्थानिक उद्याने" (२४०११७२२) लेखाशिर्षा योजनेतर तरतुदीतून भागविण्यात येईल. नियोजन विभागाच्या क्र.१९६६ दि. ३०/६/२०१७ च्या सहमतीने व वित्त विभागाचा आनौसं-२५६/अर्थ-१३, दि. ७/७/२०१७ मान्यतेने प्रशासकीय मान्यतेचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

कृषि विभागाच्या बागायती रोपमळयांचे बळकटीकरण या याजनेसाठी लेखाशिर्षातंर्गत (२४०१ १७२२) रु. ६४.४४ लाख पूरक मागणी व्दारे वित्त विभागाने मंजूर केलेला आहे. मंजूर निधी या योजनेवरील आवश्यक खर्च भागविण्यासाठी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय -

बागायती रोपमळयांचे व बळकटीकरण ही योजना राबविण्यासाठी या योजनेवरील खर्च "भाजीपाला रोपमळे,फळेरोपमळे,व स्थानिक उद्याने" (२४०११७२२) लेखाशिर्षा खालील योजनेतर तरतुदीतून भागविण्यासाठी रु.६४.४४ लाख पूरक मागणी व्दारे वित्त विभागाने मंजूर केलेला आहे. तसेच वित्त विभागाने शासन निर्णय क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. ०६/०२/२०१८ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन रु. ६४.४४ लाख वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१८०२१६१६५७०४८००१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Chandrakumar Vithal Ghaytadak

Digitally signed by Chandrakumar Vithal Ghaytadak
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=034948ccd1f6b6c67380c817b34a9af75fcfa679a4609321f9da27d9ab87b0d1, cn=Chandrakumar Vithal Ghaytadak
Date: 2018.02.16 17:00:22 +05'30'

**(च.वि.घायतडक)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. आयुक्त कृषी, महाराष्ट्र राज्य,पुणे.
२. संचालक फलोत्पादन, कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे,
३. सर्व संचालक, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे. **(व्दारा-संचालक(फलोत्पादन) कृषी आयुक्तालय, पुणे यांचे मार्फत )**
४. सर्व विभागीय कृषी सहसंचालक, **(व्दारा-संचालक फलोत्पादन,कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे मार्फत)**
५. सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, **( व्दारा- संचालक फलोत्पादन,कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे मार्फत)**
६. महालेखापाल-१/२, (लेखा व अनुज्ञेयता ) मुंबई /नागपूर,
७. महालेखापाल-१/२ , (लेखा परीक्षा ) मुंबई /नागपूर,
८. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी,पुणे.
९. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१०.सहसंचालक लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई -३२,
११.अवर सचिव, कार्या-१४८१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२.कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), कृषि व पदुम (कृषि व फलोत्पादन) विभाग, मंत्रालय,मुंबई.
१३.कक्ष अधिकारी (पदुम-१६), कृषि व पदुम (कृषि व फलोत्पादन) विभाग, मंत्रालय,मुंबई.
१४.निवड नस्ती (१३-अे)